# रुग्ण सेवा मंडळाच्या कार्यातुन समाजसेवेची प्रेरणा मिळते-डॉ. राजशेखर बालेकर



देगलूर- महाराष्ट्र राज्याच्या एका सिमेला असलेल्या देगलूर शहर व परिसरातत मागील ४६ वर्षापासून नाममात्र दरात वैद्यकीय सेवा अविरत चालू ठेवणे ही खूप कठीण बाब आहे. डॉ. व्यंकटेश काब्दे यांनी आपल्या जन्मभूमी ची बांधिलकी जपत मागील ४६ वर्षापासून दर महिन्याच्या पहिल्या रविवारी न चुकता येवून रुग्ण सेवा करतात ही खूप प्रेरणादायी बाब आहे. असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघाचे कार्याउपाध्यक्ष व ग्रंथालय चळवळीतील एक अभ्यासु व्यक्तिमत्व, डॉ. राजशेखर शंकरराव बालेकर यांनी व्यक्त केले ते छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद ) येथील स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा इंस्टिटयूट ऑफ सोशियल-इकॉनॉमिक रिसर्च नॅशनल इंटीग्रेशन या संशोधन संस्थेतर्फे सन २०२३-२४ या वर्षात देण्यात येणारा कै. वि. वा. देसाई स्मृती पुरस्कार वितरण सोहळयाचे अध्यक्ष या नात्याने बोलत होते.

व्यासपीठावर संस्थेचे अध्यक्ष डॉ.व्यंकटेश काब्दे, उपाध्यक्ष सुर्यकांत गोविंद नारलावार , देगलूर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मोहन खताळ , स्वा.रा.ती.म.संशोधन संस्थेचे सचिव सारंग टाकळकर उपस्थित होते. प्रारंभी कोषाध्यक्ष प्रा.व्ही.जि.चिंतावार यांनी रुग्ण सेवा मंडळाच्या स्थापनेपासून ते आजपर्यंतच्या विकासावर प्रकाश टाकला तर सचिव सारंग टाकळकर यांनी रुग्ण सेवा मंडळास पुरस्कार प्रदान करण्याबाबतची भूमिका स्पष्ट केली. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन सहसचिव तथा देगलूर महाविद्यालयातील लोकप्रशासन विभागप्रमुख प्रा.डॉ.बी आर कतुरवार यांनी केले तर आभार संस्थेचे कार्यकारी मंडळ सदस्य मारोती गायकवाड यांनी मानले. यावेळी डॉ. काब्दे यांनी ग्रामीण भागातील गोर गरीब लोकांची सेवा करून आपल्या पेशाचे पावित्र जपले पाहीजे व सामाजिक बांधिलकी जोपासत वैद्यकीय सेवा केली पाहिजे असे प्रतिपादन केले.

प्रसिध्द उद्योगपती शेख आयुब, गिरीश चिद्रावार, ज्ञानेश्वर पोलावार विजय चालिकवार याचा संस्थेला देनगी दिल्याबद्दल सत्कार करण्यात आला. याप्रसंगी संस्था सचिव मनोहर व्यंकटी दाशेटवार, कार्यकारिणी मंडळाचे सदस्य मधुकर गोविंदराव नारलावार, नंदकुमार मनोहर दाशेटवार, रामचंद्र किशनराव दाभडकर ,भाऊराव मोरे, रमेश राजेश्वर नारलावार, दमन चिद्रावार, सौ.स्वप्ना रेखावार उपस्थित होते. या प्रसंगी डॉ.जनार्धन भुमे, डॉ.विश्वनाथ पारसेवार ,डॉ. मनोहर मोरे, चद्रकांत रेखावार , मुरलीधर वटमवार, प्रा. गंगाधर हिंगोले, डॉ. सर्जेराव रणखांब महेश फुडलीकर, कैलास येसगे यांच्यासह बहुसंख्य नागरिक उपस्थित होते.

Scanned with OKEN Scanner